# पात्र ज्येष्ठांसाठी मोफत नित्याची दंत चिकित्सा

ऑन्टारियो सीनिअर्स डेंटल केअर प्रोग्राम (ओएसडीसीपी) पात्र ठरलेल्या सर्व ज्येष्ठांना उच्च प्रतीची दातांची निगा पुरवते.

**कोण पात्र आहे?**

तुम्ही पात्र असाल जर तुम्ही:

- ६५ किंवा त्याहून अधिक वयाचे असाल
- ऑन्टारियोचे रहिवासी असाल
- एका व्यक्तीचे वार्षिक निव्वळ उत्पन्न 25,480 डॉलर्स किंवा त्यापेक्षा कमी किंवा जोडप्याचे एकत्रित वार्षिक निव्वळ उत्पन्न 42,290 डॉलर्स किंवा त्यापेक्षा कमी असल्यास
- कॅनेडियन डेंटल केअर प्लॅन (सीडीसीपी) व्यतिरिक्त इतर कोणतेही दंत फायदे नाहीत, ज्यात खाजगी विमा किंवा ओंटारियो वर्क्स, ओंटारियो डिसेबिलिटी सपोर्ट प्रोग्राम किंवा नॉन-इन्शुअर हेल्थ बेनिफिट्स यांसारख्या सरकारी कार्यक्रमांतर्गत दंत संरक्षण समाविष्ट आहे. क्लायंट सीडीसीपी साठी पात्र होऊ शकतात आणि तरीही क्लायंट पात्रता निकष पूर्ण करत असल्यास ओएसडीसीपी साठी पात्र असू शकतात.

**मला दंत चिकित्सा कुठे मिळू शकेल?**

सार्वजनिक आरोग्य विभाग (पीएचयू) आणि सहभागी कम्युनिटी हेल्थ सेंटर (सीएचसी), आदिवासी आरोग्य सेवा केंद्रे (एएचएसी), तसेच काही भागात फिरत्या दंत चिकित्सालयांद्वारे दातांची निगा सेवा पुरवली जाते.

**कोणत्या सेवा समाविष्ट आहेत?**

- तपासणी आणि निर्धारण
- प्रतिबंधात्मक सेवा
- तुटलेले दात आणि पोकळी ठीक करण्यासाठी पुनर्संचयित सेवा
- दात किंवा अस्वाभाविक ऊती काढून टाकण्यासाठी तोंडातील शस्त्रक्रिया
- क्ष-किरण
- भूल देणे
- संसर्ग आणि वेदनांवर उपचारांसाठी एन्डोडॉन्टिन्क सेवा
- हिरड्यांची अवस्था आणि रोगांवर उपचार करण्यासाठी पिरिओडॉन्टल सेवा.

**कवळी बद्दल काय?**

कवळी लावण्यासारख्या प्रोस्टोडोन्टिक (कृत्रिम) सेवा अंशतः समाविष्ट केल्या जातील. कृपया अधिक माहितीसाठी आपल्या स्थानिक सार्वजनिक आरोग्य विभागाशी बोला.

**मी अर्ज कसा करू?**

ऑन्टारियो सीनिअर्स डेंटल केअर प्रोग्रामसाठी अर्ज करण्याचे बरेच पर्याय उपलब्ध आहेत:

- **ontario.ca/SeniorsDental** वर ऑनलाइन अर्ज करा
- आपला अर्ज मुद्रित करा, भरा आणि टपालाने पाठवा
- नोंदणी अर्ज घेण्याठी आणि/किंवा आपला अर्ज पूर्ण भरण्याकरता मदत मिळवण्यासाठी आपल्या स्थानिक सार्वजनिक आरोग्य विभाग किंवा सहभागी सीएचसी किंवा एएचएसीला भेट द्या.

**माझा अर्ज मंजूर झाल्यावर काय होते?**

एकदा तुमचा अर्ज मंजूर झाला की तुम्हाला एक स्वागत संच आणि दंत कार्ड पाठविले जाईल. सेवा प्राप्त करण्यासाठी, हे कार्ड सार्वजनिक आरोग्य विभाग, कम्युनिटी हेल्थ सेंटर किंवा सेवा प्रदान करणाऱ्या आदिवासी आरोग्य सेवा केंद्रांना सादर करा.

तुम्ही पात्र असलेल्या प्रत्येत वर्षात कार्यक्रमामध्ये सातत्याने सहभागी होण्यासाठी किंवा आवश्यक असल्यास कार्यक्रमामध्ये पुन्हा अर्ज कसा करावा याबद्दल आपल्याला सूचित केले जाईल.

**आणि मला मदत हवी असेल तर?**

कॉल करा 416-916-0204
टोल-फ्री 1-833-207-4435
टीटीवाई 1-800-855-0511

**MARATHI (Eastern Hindi)** – FREE ROUTINE DENTAL CARE FOR ELIGIBLE SENIORS. Publication No. (300070). ISBN 978-1-4868-5410-3. PDF. August 2026 © King's Printer for Ontario, 2024.